टॉनसिलायटिस (Tonsillitis )

टॉन्सिल,   है आपल्या घशाच्या मागच्या बाजूला असणारे दोन ग्रंथी,   आणि त्याचा संसर्ग म्हणजे टॉनसिलायटिस  टॉन्सिल  हे घशात शिरणाऱ्या बाहेरील जंतूंना जखडून, त्यांच्या पासून आपले संरक्षण करतात.

जंतुंच्या विरोधात ते प्रतिकारात्मक प्रतीपिंड तयार करतात. पण कधी अती संसर्ग झाला तर ते स्वतः संसर्गित होतात.

टॉनसिलायटिस  सामान्यतः लहान मुलांमध्ये होते.

ह्याचे 3 प्रकार असतात:

- **अक्युट (Acute tonsillitis)** ह्याची लक्षणे साधारण 3 ते 4 दिवस राहतात.
- **रिकरअंट (Recurrent tonsillitis)** जेव्हा हा संसर्ग वारंवार होतो.
- **क्रॉनिक (Chronic tonsillitis)**  जेव्हा हा संसर्ग कायम स्वरुपी राहतो.

मुख्य लक्षणे

घसा दुखणे, ताप येणे, कान दुखणे, गिळायला त्रास होणे, भूक न लागणे. टॉन्सिल वर पांढरट थर दिसतो

कारणे व धोक्याचे घटक-

विषाणू किंवा जीवाणूंमळे हे होते.

निदान

डॉक्टरांचा चा सल्ला घेणे आवश्यक आहे. ते तुमचा घसा तपास्तील. माने मध्ये काही गाठी आल्या आहेत का, ते पण बघतील.

ह्यांपैकी काही तपास केले जातील

- **घशाची स्वाब चाचणी .**
- **रक्ताचे तपास**

रोगाचे गंभीर परिणाम

- टॉन्सिल च्या भोवती पस जमा होणे (peritonsillar abscess)
- कानाचे इन्फेक्शन
- श्वास घ्यायला त्रास होणे (obstructive sleep apnea)
- इनफेक्शन आजू बाजूच्या पेशींमध्ये पसरणे

उपचार

आजाराच्या कारणावर उपचार अवलंबित अस्तो.

**औषधे**

**जर विषाणूंमुळे बाधा झाली असेल तर डॉक्टर तुम्हाला अँटिबायोटिक्स देतील. ताप व अंगदुखी साठी पण औषधे दिली जातील.**

अतिरिक्त सूचना:

- आराम करणे
- पाणी पिणे
- नरम आहार घेणे
- कोमट मिठाच्या पाण्याने गुळण्या करणे

**शस्त्रक्रिया (Tonsillectomy )**

टॉन्सिल्स हे आपल्या रोग प्रतिकार शक्तीचा एक महत्त्वाचा घटक आहे, म्हणून तुमचे डॉक्टर  हा संसर्ग औषधांनी बरे करण्याचा प्रयत्न करतील. पण जर हा त्रास वारंवार होत असेल, किंव्वा तुमचे टॉन्सिल एवढे मोठे झालेत की त्याच्याने तुम्हाला श्वास घ्यायला अगर गिळायला त्रास होतो आहे, तर ते काढावे लागतील. ह्या शस्त्रक्रियेला टॉन्सिलेक्टोमी ( tonsillectomy) असे म्हणतात.

ही शस्त्रक्रिया पूर्ण भूल देऊन होते व संपूर्णतः तोंडातून होते. ह्यासाठी विविध उपकरणं वापरली जातात, उदा. साधे इन्स्ट्रुमेंट, लेझर, coblator. पेशंटसाठी सर्वोत्तम काय ठरेल हे डॉक्टरांशी सल्ला करून ठरवा.

Dr. Anagha Joshi

Professor, LTMG Hospital & LTM Medical College

Consultant, HN Reliance Hospital

09820298027